डबल ट्रबल: बिग स्टार्सच्या अहंकाराची टक्कर

दोन मोठ्या कलाकारांना घेऊन चित्रपट बनवण्याने चित्रपटाची स्टार व्हॅल्यू वाढत असली तरी चित्रपट पूर्ण होण्याची शक्यता मात्र कमी होते. या विधानातील गांभीर्य पटवणारे हे काही नमुनेदार दाखले...

□ ज्योती व्यंकटेश

डेव्हिड धवनचा *दीवाना मस्ताना* जवळपास पूर्ण झालेला. फक्त क्लायमॅक्स चित्रित करायचा बाकी होता. पण तो तर दोन नायकांच्या हट्टामुळे रखडला होता. अनिल कपूर आणि गोविंदा हे त्यातले दोन नायक आणि नायिका एक, जूही चावला. एक फूल दो माली अशी सिच्युएशन. त्यामुळे हे फूल आपल्यालाच मिळावं अशी दोन्ही नायकांची इच्छा. कारण नायिका ज्याला मिळते तो चित्रपटाचा खरा हीरो असं चुकीचं समीकरण दर्शकांच्या आणि म्हणून कलाकारांच्याही मनावर बिंबलेलं आहे.



*सौदागर*च्या सेटवर बालिश चाळे करणाऱ्या दिलीपकुमार आणि राजकुमारला युनिटमध्ये चुन्नू - मुन्नू म्हणून चिडवत.



*दीवाना मस्ताना*मध्ये नायिका जूहीसाठी भांडणाऱ्या अनिल आणि गोविंदाच्या तोंडाला दिग्दर्शकाने पानं पुसली.

अनिल कपूर आणि गोविंदा नायक असण्याचा हा मान गमवायला तयार नव्हते. परिणामी चित्रपट तब्बल पाच महिने रखडला. मग डेव्हिड धवनने लेखक या नात्याने अनीस बझ्मीशी सल्ला-मसलत केली. अनीसने सुचवलेला तोडगा डेव्हिडच्या पचनी पडला आणि त्याने तो दोन्ही जिद्दी कलाकारांच्याही गळी उतरवला. त्याने अनिल आणि गोविंदा या दोघांच्याही तोंडाला पानं पुसली. सलमानला पाहुणा कलाकार म्हणून पाचारण केलं आणि नायिका या आगंतुक पाहुण्याच्या हाती आयतीच दिली. याला म्हणतात नाही तुला नाही मला...

अर्थात अशी परिस्थिती काही *दीवाना मस्ताना*च्या निमित्ताने पहिल्यांदाच उद्भवलेली नाही. हे तर अनादी कालापासून म्हणजे चित्रपट जगताच्या अनादी कालापासून होत आलंय. दोन हीरोंना घेऊन चित्रपट बनवला की त्याची बाजारातली किंमत दुप्पट होते. तोंडी लावायला एखादी गुलछबू नायिका असली की आपोआप प्रेमत्रिकोणही रंगवता येतो. पण चित्रपटाची विक्री किंमत वाढवण्याच्या अट्टहासाशी अनेकदा कलाकारांच्या अहंकारांची टक्कर होऊन चित्रपट रखडण्याची जबरदस्त किंमत निर्मात्याला चुकवावी लागते. बॉलीवूडच्या भाषेत याला डबल ट्रबल म्हणतात. डबल हीरोंच्या अहंकारामुळे निर्माण झालेला ट्रबल!

चाळीस वर्षांपूर्वी *पैगाम* नावाचा चित्रपट निर्मितीच्या प्रक्रियेत होता. त्यात दोन महारथी होते. दिलीपकुमार आणि राजकुमार. दोघंही आपापल्या स्टार इगोपायी निर्माता-दिग्दर्शकांना वारंवार अडचणीत आणत. आपलं पात्र अधिक सशक्त असावं असा दोघांनीही आपापल्या परीने निर्माता-दिग्दर्शक वासू मेननवर दबाव आणायला सुरुवात केली. सेटवरही दोघं सदैव एकमेकांचे पाय ओढण्यात गुंतलेले असायचे. वैमनस्याची आतल्या आत धुमसणारी आग एक दिवस लाव्हा बनून बाहेर आली.

दिलीपकुमार राजकुमारच्या श्रीमुखात भडकावतो, असं दृश्य चित्रित करायचं होतं. दिलीपकुमार ही नामी संधी हातची कशी दवडणार? त्याने सगळं बळ एकवटून राजकुमारच्या अशी काही लगावली की त्याच्या गालावर पाच बोटं उमटली. पुन्हा मी दृश्य वास्तववादी वाटावं यासाठी असं केलं म्हणायला दिलीपकुमार मोकळा!

चित्रीकरण संपलं, चित्रपट मराठा मंदिरमध्ये प्रदर्शितही झाला. दोन दिग्गज कलाकार काम करत असल्याने अपेक्षित यशही मिळालं. पण दिलीपने खरोखरच स्वाभाविक अभिनयाच्या नादात आपल्या थोबाडीत मारली होती का? ही शंका राजकुमारच्या मनातून काही केल्या जाई ना. *पैगाम*च्या त्या थपडेचा सल राजकुमारच्या मनात बरीच वर्षं होता.

नंतर तब्बल तेवीस वर्षांनी दोघांना पुन्हा एकत्र चमकवण्याचं श्रेय सुभाष घईंना जातं. मात्र त्या अख्यायिकेविषयी ज्ञात असलेल्या सुभाष घईंनी दोघांच्या अहम्‌ची टक्कर होणार

नाही याची पुरेपूर खबरदारी घेतली. त्यांनी मुस्कटात मारण्याचा एकही सीन चित्रपटात नसेल याचं भान बाळगलं. इतकंच नाही तर दोन्ही व्यक्तिरेखा तोडीस तोड बेतल्या. शिवाय सुभाषजींनी आणखी एक तोडगा काढला. संपूर्ण स्क्रिप्ट दोघांच्या हाती सोपवून भूमिकेची निवड त्यांच्यावरच सोपवली. सुदैवाने दोघांनीही कास्टिंगची जबाबदारी सुभाष घईवर सोपवून पुढचं काम सोपं केलं.

*सौदागर*चं चित्रीकरण निर्वेध पार पडलं. दरम्यान सेटवर चुन्नू-मुन्नूच्या(त्यांच्या) चर्चांना उधाण आलं होतं. उदाहरण द्यायचं तर चुन्नूला हॉटेलमध्ये ज्या स्टेट्सची खोली देण्यात आली त्याच स्टेट्सची खोली मुन्नूलाही मिळावी, मुन्नूचे कपडे ज्या दर्जीकडून शिवले जातात त्यानेच चुन्नूचेही कपडे बेतावेत वगैरे वगैरे. दोघंही लहान मुलांसारखे भांडत होते, रुसत होते म्हणून युनिटने त्यांना चुन्नू-मुन्नू म्हणूनच संबोधायला सुरुवात केली.



मैं तेरा खून पी जाऊंगा...*नफरत की आंधी*मध्ये धर्मेंद्र - जितेंद्र. त्यांच्या वैमनस्यात *सम्राट* रखडला.



प्रौढ वयात मित्र बनलेल्या धर्मेंद्र - राजेंद्र दरम्यान *आयी मिलन की बेला*च्या सेटवर वैर धुमसत होतं.



दुश्मन-दोस्त राजेश - शत्रूच्या भांडणाचा बळी ठरला.

सुभाष घईंनी शिताफीने त्यांच्यात बेबनाव होऊ दिला नाही. *सौदागर*च्या निमित्ताने सुभाष घईचा सौदा फायद्याचा ठरला. तो सुरू होण्याआधी सुभाष घईचा *सौदागर* कधीही पूर्ण होणार नाही ही जाणकारांची भविष्यवाणी खोटीही ठरली आणि तेवीस वर्षांच्या वैराला पूर्णाहुती मिळाली. *सौदागर*सारखं भाग्य अशाप्रकारच्या अडचणीत सापडलेल्या प्रत्येक चित्रपटाला लाभतंच असं नाही. कलाकारांच्या अहंकारापायी अर्धवट रखडण्याचं दुर्भाग्य बऱ्याच चित्रपटांच्या नशिबी येतं. *शत्रुता* जितेंद्र आणि शत्रुघ्न सिन्हाच्या शत्रुत्वापायी अपूर्ण राहिला. *सम्राट* जितेंद्र-धर्मेंद्रच्या वैराच्या फेऱ्यात अडकला. *शत्रुता*चं चित्रीकरण जयपूरला चाललं होतं. तलवारबाजीचं एक दृश्य चित्रित करताना दोघंही भांड भांड भांडले. त्यांना सोडवता सोडवता युनिटच्या नाकी नऊ आले. *सम्राट*मध्ये दोघं नायक हेमामालिनीसाठी असेच भांडले. *शत्रुता* आणि *सम्राट* तेव्हा जे रखडले ते आजतागायत पूर्ण होऊ शकले नाहीत. अमिताभ आणि शत्रुघ्नचा *यार-दोस्त*ही दोघांच्या अहंगंडाचा शिकार होऊन असाच अर्धवट डब्यात पडलाय.

ज्येष्ठ नृत्य-दिग्दर्शक कमल मास्तर यांनी दिग्दर्शक म्हणून राजेश खन्ना-शत्रुघ्न सिन्हाला घेऊन *दुश्मन-दोस्त*ची योजना आखली. काहीतरी नवं करण्याच्या हेतूने त्यांनी या दोघांची पेअर ठरवली. दर्शकांसाठी या दोघांची जोडी अनोखी ठरलीही असती कदाचित. दोघांचं वैर उभ्या इंडस्ट्रीला माहीत होतं. या चित्रपटाच्या निमित्ताने ते संपण्याची शक्यता होती. त्याचा अर्थातच चित्रपटाला मोठा व्यावसायिक फायदा होणार होता. कास्टिंगची वेळ आली तेव्हा सोनू-मोनूच्या नावाच्या दोन चिठ्ठ्या राजेश-शत्रूच्या समोर टाकण्यात आल्या. दोघांनी चिठ्ठीत आलेल्या भूमिका निमूटपणे स्वीकारल्या. चित्रीकरणाचं पहिलं सत्र व्यवस्थित पार पडलं. पण पाच रिळं झाल्यावर दोघांनीही खरे रंग दाखवायला सुरुवात केली. दोघंही नवनव्या अटी घालू लागले. डेटसाठी अडवणूक करू लागले. शेवटी त्यांच्या वैरामुळे रखडलेला चित्रपट कमल मास्तरांचं निधन झालं तरी पूर्ण झाला नाही.

*आयी मिलन की बेला*ची अशीच गमतीशीर आठवण आहे. राजेंद्रकुमार-धर्मेंद्रला घेऊन सुरू केलेला तो चित्रपट मोहनकुमारने कसा पूर्ण केला ते त्यांनाच माहीत. त्यावेळी धर्मेंद्र नवोदित होता तर राजेंद्रकुमारच्या नावाचा दबदबा होता. दोघांचेही इगो पावलोपावली डोकं वर काढत. क्लायमॅक्सच्या वेळी दोघांमधल्या वितंडवादाने परिसीमा गाठली. स्वतःची भूमिका वरचढ व्हावी म्हणून राजेंद्रकुमार आपल्या व्यक्तिरेखेला कात्री लावण्याच्या प्रयत्नात असल्याची कुणकुण धर्मेंद्रला लागली. त्याने लगेच अस्तन्या सावरल्या. मोहनकुमारनी शिताफीने दोघांचे इगो सांभाळून *आयी मिलन की बेला* पूर्ण केला.

मध्यंतरी राजकुमार संतोषीने *लज्जा*नंतर *इश्क*ची घोषणा केली. दोन नायकांची कथा असलेल्या *इश्क*साठी आमीर-शाहरूखची वर्णी लागली. आजवर या दोघांची जोडी पडद्यावर आलेली नाही. पण *इश्क*च्या घोषणेबरोबरच आमीर-शाहरूखच्या बेबनावाच्या बातम्या कानावर येऊ लागल्या. आमीरला एक-दोन सत्रात चित्रीकरण पूर्ण करायचं होतं. ती त्याची नेहमीची शैली आहे. पण शाहरूख एकावेळी सलग इतक्या तारखा द्यायला राजी नव्हता. दोघंही आपापला हेका सोडायला तयार नाहीत हे पाहून राजकुमार संतोषीला वेळीच शहाणपण सुचलं आणि डबल ट्रबलच्या कोंडीत सापडण्याआधीच त्यातून सुटला!